# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृह

**मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. २४/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित स्थायी समिती विशेष बैठकीचे इतिवृत्त.**

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचेकडील पत्र क्र.साशा/कार्या-३/नपा-२/पिठासीन अधि./मिरा भाईंदर मनपा/२०२१, दि. १०/०२/२०२१ अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी श्री. मिलिंद बोरीकर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेली आजची विशेष बैठक सकाळी ११.५८ वाजता श्री. मिलिंद बोरीकर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांनी केली.

**उपस्थित सदस्य :-**

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. अशोक सूर्यदेव तिवारी |
| २ | श्री. हसमुख मोहनलाल गहलोत |
| ३ | श्री. संजय अनंत थेराडे |
| ४ | श्री. दिनेश तेजराज जैन |
| ५ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |
| ६ | श्री. सुरेश जगदीश खंडेलवाल |
| ७ | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार |
| ८ | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी |
| ९ | श्रीम. सुनिता रमेश जैन |
| १० | श्रीम. शानु जोरावरसिंह गोहिल |
| ११ | श्री. एलायस दुमिंग बांड्या |
| १२ | श्री. कमलेश यशवंत भोईर |
| १३ | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील |
| १४ | सौ. स्नेहा शैलेश पांडे |
| १५ | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| १६ | श्रीम. गिता हरिष परदेशी |

**गैरहजर सदस्य :- निरंक**

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन व या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील विषयाचे वाचन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

निर्धारित कार्यक्रमानुसार मंगळवार दिनांक २३/०२/२०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले चार उमेदवारांची पाच नामनिर्देशन पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक २४/०२/२०२१ रोजी सकाळी ११.५९ वाजता सादर केली. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. कमलेश यशवंत भोईर | श्री. एलायेस दुमिंग बांड्या | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील |
| २ | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश |
| ३ | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र |
| ४ | श्री. जैन दिनेश तेजराज | श्री. गेहलोत हसमुख मोहलनाल | श्री. थेराडे संजय अनंत |
| ५ | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश |

तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(२) नुसार नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम दुपारी १२.०० वाजता सुरु झाले.

१. सर्वप्रथम श्री. कमलेश यशवंत भोईर यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. कमलेश यशवंत भोईर यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. एलायेस दुमिंग बांड्या यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्री. कमलेश यशवंत भोईर यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

२. श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांचे नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्या श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ३(३) अन्वये कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

परंतु असे की, स्थायी समिती सभापतीच्या नियुक्तीकरिता सूचक किंवा अनुमोदक असणाऱ्या नगरसेवकास सभापती पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही.

श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांनी नियम ३(३) चे उल्लंघन केलेले असल्याने श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांचे नामनिर्देशन पत्र महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(२) अन्वये फेटाळण्यात येत आहे.

३. श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश यांचे नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ३(३) अन्वये कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

परंतु असे की, स्थायी समिती सभापतीच्या नियुक्तीकरिता सूचक किंवा अनुमोदक असणाऱ्या नगरसेवकास सभापती पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही.

श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश यांनी नियम ३(३) चे उल्लंघन केलेले असल्याने श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांची दोन्ही नामनिर्देशन पत्र महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(२) अन्वये फेटाळण्यात येत आहेत.

४. श्री. जैन दिनेश तेजराज यांचे नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्री. जैन दिनेश तेजराज यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. गेहलोत हसमुख मोहलनाल यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. थेराडे संजय अनंत यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्री. जैन दिनेश तेजराज यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

५. श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांनी यांनी सादर केलेल्या नामनिर्देशन पत्रावर सुचक श्रीम. रकवी वैशाली गजेंद्र व अनुमोदक श्री. खंडेलवाल सुरेश जगदीश या स्थायी समिती सदस्यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ३(३) अन्वये कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नामनिर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

परंतु असे की, स्थायी समिती सभापतीच्या नियुक्तीकरिता सूचक किंवा अनुमोदक असणाऱ्या नगरसेवकास सभापती पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही.

छाननीअंती १) श्री. शाह राकेश रतिशचंद्र व २) श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश यांची नामनिर्देशन पत्र फेटाळण्यात आलेली असून, १) श्री. कमलेश यशवंत भोईर व २) श्री. जैन दिनेश तेजराज हे दोन वैध उमेदवार असल्याचे घोषीत करण्यात आले.

अशा प्रकारे छाननीचे काम दुपारी १२.०२ मि. सुरु करुन दुपारी १२.०९ मिनीटांनी संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन

समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(३) अन्वये ज्या कोणत्या उमेदवारास आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी दुपारी १२.१० ते दुपारी १२.२५ या १५ मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देश पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा शैलेश पांडे व श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील यांनी सभागृह सोडून जात असल्याचे सांगितले व १) श्रीम. स्नेहा शैलेश पांडे २) श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील ३) श्री. कमलेश यशवंत भोईर व ४) श्री. एलायस दुमिंग बांड्या हे चार सदस्य सभागृह सोडून सभागृहाच्या बाहेर गेले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही. त्यामुळे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात राहिलेले आहेत.

उमेदवार दोन शिल्लक असल्याने नियम ६(२) प्रमाणे उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे आवश्यक असुन, वर्णानुक्रमे अंमित नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्री. कमलेश यशवंत भोईर

२) श्री. जैन दिनेश तेजराज

" सभापती " पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार शिल्लक राहिले आहेत. सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन शिल्लक राहिल्याने नियम ६(३) प्रमाणे "हात वर" करुन मतदान घेण्यात येत आहे. प्रथम उमेदवार श्री. कमलेश यशवंत भोईर यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. तेव्हा श्री. कमलेश यशवंत भोईर यांना कोणत्याही सदस्यांनी मत दिलेले नाही.

दुसरे उमेदवार श्री. जैन दिनेश तेजराज यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर श्री. जैन दिनेश तेजराज यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. अशोक सूर्यदेव तिवारी |
| २ | श्री. संजय अनंत थेराडे |
| ३ | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार |
| ४ | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी |
| ५ | श्री. दिनेश तेजराज जैन |
| ६ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |

| | |
|---|---|
| ७ | श्री. हसमुख मोहनलाल गहलोत |
| ८ | श्री. सुरेश जगदीश खंडेलवाल |
| ९ | श्रीम. सुनिता रमेश जैन |
| १० | श्रीम. शानु जोरावरसिंह गोहिल |

तसेच श्री. अनिल दिवाकर सावंत व श्रीम. गिता हरिष परदेशी हे दोन सदस्य तटस्थ राहिलेले आहेत.

हात वर करुन मतदान घेतले असता १) श्री. कमलेश यशवंत भोईर यांना ०० इतकी मते व २) श्री. जैन दिनेश तेजराज १० इतकी मते मिळाली. ०२ सदस्य तटस्थ राहिलेले आहेत.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्री. जैन दिनेश तेजराज यांना मिळाल्याने ते सभापती, स्थायी समिती पदी एक वर्षाकरिता बहुमताने निवडून आल्याचे नियम ६(७) अन्वये पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात आले. अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले. सभेच्या पूर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. तद्नंतर उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामाकाज दुपारी १२.३४ वाजता संपल्याचे जाहिर केले.

दिनांक :- २४/०२/२०२१
स्थान :- मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका

(मिलिंद बोरीकर)
पिठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
स्थायी समिती सभापती निवडणूक २०२१
मिरा भाईंदर महानगरपालिका